# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: ८ सप्टेंबर, २०२२

---

जळगाव दि.८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाव्दारा आयोजित मुलाखतींव्दारा पाच विद्यार्थ्यांची कंपनीत निवड करण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाव्दारा विविध कंपन्यांच्या परिसर मुलाखतींचे आयोजन करुन विद्यार्थ्यांना रोजगाराची सुविधा निर्माण करुन देण्यात येत असते. याचाच एक भाग म्हणून विद्यापीठीय रसायन तंत्रज्ञान संस्थेच्या बी.टेक. केमिकल इंजिनिअरींगच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या ऑनलाईन मुलाखतींमध्ये विवेक कोल्हे आणि रेणूका माळी या दोन विद्यार्थ्यांची पूणे येथील गेक्सॉन इंडिया प्रा.लि. या कंपनीत निवड करण्यात आली आहे.

तसेच एम.एस्सी. फिजीक्स, ऑरगॅनिक केमिस्ट्री, ॲनालिटीकल केमिस्ट्री, इंडस्ट्रीयल केमिस्ट्री आणि पॉलिमर केमिस्ट्रीच्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठात प्रत्यक्ष मुलाखतींचे आयोजन करण्यात आले. या मुलाखतींमधून एम.एस्सी फिजीक्सचा विशाल परशुराम, एम.एस्सी. इंडस्ट्रीयल केमिस्ट्रीचा अजय भावसार आणि एम.एस्सी. पॉलिमर केमिस्ट्रीचा प्रमोद गुरेल या तीन विद्यार्थ्यांची औरंगाबाद येथील गरवारे हायटेक फिल्मस् कंपनीत निवड झाली आहे. या परिसर मुलाखती आयोजनासाठी प्लेसमेंट ऑफीसर सोनाली दायमा, प्रा.अमरदीप पाटील, प्रा. विकास गिते यांनी व्यवस्थापन केले. विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. व्ही.एल.माहेश्वरी, प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, प्रा.जे.बी.नाईक, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, समन्वयक डॉ.रमेश सरदार, उपसमन्वयक डॉ. उज्वल पाटील यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्याचे अभिनंदन केले.

---

-------

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी